## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- २४४४/२०२२

**अपिलार्थी, श्री.सदानंद एस. गणवीर**
अंबिका नगर, यवतमाळ ४४५ ००१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) कार्यालय डहाणू, जुनी देना बँकसमोर, डहाणु (प.), ता.डहाणु, जि.पालघर.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, डहाणु वनविभाग डहाणु, मु.पो.डहाणु ता.डहाणु, जि.पालघर.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २१.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.०३.२०२२ | -- | ०९.०५.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २२.०८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने, आज पावेतो काहीच न कळविल्याने माहिती अप्राप्त असल्याने. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" माहे ०१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ पावेतो या महिन्यात आपल्या रेंज कार्यालयाने संबंधित उपवनसंरक्षक वनविभागाकडून शासनाच्या योजनेअंतर्गत कामाकरीता प्राप्त एकुण धनादेशावरील रकमेची माहिती तसेच प्राप्त एकुण धनादेशाच्या रकमा कशा खर्ची घातल्या त्या रोखलेखा पुस्तीकेची माहिती तसेच बिल व बिलाच्या व्हाऊचरसह छायाप्रती उपलब्ध करुन देण्याबाबत.*

1) *१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत उपवनसंरक्षक वनविभाग डहाणू कार्यालयाकडून एकूण प्राप्त धनादेशाच्या रकमा कशा खर्ची घातल्या त्या रोखलेखा पुस्तीकेची सविस्तर माहिती व त्याचे बिल व बिलाचे व्हाऊचरची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देण्यात यावी.*
2) *१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत आपल्या रेंज कार्यालयाने उपवनसंरक्षक वनविभाग डहाणू कार्यालयाकडून एकूण प्राप्त रकमेची माहिती/RTGS द्वारा एकूण प्राप्त रकमेची माहिती जसे RTGS चा नंबर त्यावरील रक्कम व त्याचा दिनांक व बँकेच्या नावाची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देयात यावी."*

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, अपिलार्थी यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.), कार्यालय डहाणू यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.), कार्यालय डहाणू यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ३१.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०९.१२.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) कार्यालय डहाणू, जुनी देना बँकसमोर, डहाणु (प.), ता.डहाणु, जि.पालघर.

**<u>-यांना प्रत</u>**
विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी
(प्रादे.) कार्यालय डहाणू, जुनी देना बँकसमोर,
डहाणु (प.), ता.डहाणु, जि.पालघर. **<u>यांचे मार्फत प्रत रवाना</u>**.

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ